महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

कशिमं-२०२६/सात/संलग्नता/E-3187017 दिनांक:- स्वाक्षरी खालील

परिपत्रक (Web-Circular)

प्रति,
१. अधिष्ठाता/विभागप्रमुख, शासकीय कला परिसंस्था
२. अध्यक्ष/सचिव, कला परिसंस्थाच्या सोसायटीचे/ ट्रस्टचे
(अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्था)
३. प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्था

**विषय:- कला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या कला परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता अभ्यासक्रमनिहाय महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची संलग्नता घेणेबाबत.**

**संदर्भ:-** नियामक परिषदेची दि. २१.०५.२०२५ रोजीची बैठक

सर्व कला परिसंस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ अन्वये मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंडळाच्या नियामक परिषदेच्या दि. २१.०५.२०२५ रोजीच्या तृतीय बैठकीत सर्व अभ्यासक्रमाकरीता समान संलग्नता शुल्क करण्याचे निदेश दिलेले होते. त्यास अनुसरून संलग्नता शुल्क खालील प्रमाणे प्रती वर्ष व प्रती अभ्यासक्रम रु. ७५००/- आहे.

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | संलग्नता शुल्क (रु.) प्रती वर्ष |
|---|---|---|
| १ | फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट ॲण्ड डिझाईन | ७५००/- |
| २ | कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (अे.टी.डी.) | ७५००/- |
| ३ | रेखा व रंगकला पदविका | ७५००/- |
| ४ | उपयोजित कला पदविका | ७५००/- |
| ५ | शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका | ७५००/- |
| ६ | अंतर्गत गृहसजावट पदविका | ७५००/- |
| ७ | वस्त्रकला पदविका (टेक्सटाईल)- प्रिंटिंग व डाईंग | ७५००/- |
| ८ | वस्त्रकला पदविका (टेक्सटाईल)- विव्हिंग | ७५००/- |
| ९ | मातकाम पदविका | ७५००/- |
| १० | धातुकाम पदविका | ७५००/- |
| ११ | कला शिक्षणशास्त्र पदविका | ७५००/- |
| १२ | आर्ट मास्टर प्रमाणपत्र (अंशकालिन/Part-time) | ७५००/- |
| १३ | आर्ट मास्टर प्रमाणपत्र (सुट्टीतील/Vacational) | ७५००/- |

नियामक परिषदेच्या दि. २२.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता वरील प्रमाणे प्रती वर्ष व प्रती अभ्यासक्रम शुल्क आकारून कला परिसंस्थांना संलग्नता देण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्याचे निदेश दिले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित कला परिसंस्थांनी पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरीता दि. ०४.०५.२०२६ ते १६.०५.२०२६ पर्यंत संलग्नता घ्यावी.

कला परिसंस्थांना संलग्नता देण्याकरीता महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या msbae.ac.in या संकेतस्थळावर Affiliation Menu मध्ये लिंक उपलब्ध करून दिलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये अभ्यासक्रमनिहाय संलग्नता घेण्याकरीता कला परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

ज्या कला परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मध्ये संलग्नता घेतांना ऑनलाईन भरलेल्या माहितीमध्ये (शिक्षक, ट्रस्टची माहिती, इ.) काही बदल असल्यास सदर माहिती अद्यावत करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता प्रती अभ्यासक्रम रु. ७५००/- इतके शुल्क भरून संलग्नता घ्यावी.

ज्या कला परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मध्ये संलग्नता घेतलेली नाही, अश्या संस्थांनी नवीन रजिस्ट्रेशन Home Page वर जाऊन Institute Registration Tab ओपन करून रजिस्ट्रेशन करावे. तदनंतर संलग्नतेची माहिती भरून व ऑनलाईन संलग्नता शुल्क भरून संलग्नता घ्यावी.

नवीन कला परिसंस्थांनी संलग्नता घेतांना खालील कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

१. अभ्यासक्रमनिहाय शासन मान्यतेचे आदेश/पत्र
२. व्यवस्थापनाच्या कार्यकारणी समिती संबंधीचे कागदपत्रं Management Committee
३. संलग्नतेच्या अटीबाबतचे हमीपत्र (नमूना सोबत जोडला आहे)

कला परिसंस्थांनी ज्या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मध्ये संलग्नता शुल्क भरून संलग्नता घेतलेली नाही, अशा कला परिसंस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ चे संलग्नता शुल्क शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये संलग्नता घेते वेळी संलग्नता शुल्क घेण्यात येणार आहे.

ज्या कला परिसंस्था शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता मंडळाची संलग्नता घेणार नाहीत, त्या संस्थेतील अभ्यासक्रमांची शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार नाही. तसेच संस्था स्तरावरही प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया करता येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

कला परिसंस्थांनी विहीत वेळेत ऑनलाईन पद्धतीने संलग्नता दि. १६.०५.२०२६ पर्यंत घेण्याबाबतची कार्यवाही करावी. कला परिसंस्थांना दि. १६.०५.२०२६ पर्यंत संलग्नता न घेतल्यास पुढील कालावधी दि. १७ ते २० मे, २०२६ करीता प्रती अभ्यासक्रम रु.५००/- संलग्नतेकरीता विलंब शुल्क आकारण्यात येईल.

संलग्नता घेतांना काही अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायं. ६.००) कुमारी वृषाली घोटणे 9284381041 ईमेल- vrushali.gothane@bynaric.in यांच्याशी संपर्क साधावा.

Digitally signed by
Smita Nilesh Kinkale
Date: 29-04-2026
14:14:40

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी:

१. मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. निरीक्षक, चित्रकला व शिल्पमहाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित